महाराजा सयाजीराव ज्ञानमाला : ४५

# महाराजा सयाजीराव आणि बडोद्यातील संगीत शिक्षण

धारा भांड मालुंजकर




महाराजा सयाजीराव गायकवाड संशोधन व प्रशिक्षण संस्था,
११५ म. गांधीनगर, औरंगाबाद - ४३१००५ मो. : ९८८१७४५६०४
Email : sayajiraogsps@gmail.com / www.sayajiraogaekwad.com

महाराजा सयाजीराव ज्ञानमाला : ४५

# महाराजा सयाजीराव
# आणि
# बडोद्यातील संगीत शिक्षण

धारा भांड मालुंजकर

महाराजा सयाजीराव संशोधन संस्था

महाराजा सयाजीराव आणि
बडोद्यातील संगीत शिक्षण
इतिहास
धारा भांड मालुंजकर
●
प्रकाशन क्रमांक - ६५
पहिली आवृती - २०२१
●
प्रकाशक
बाबा भांड
सचिव
महाराजा सयाजीराव गायकवाड
संशोधन-प्रशिक्षण संस्था
११५, म. गांधीनगर
औरंगाबाद - ४३१ ००५
Email : baba.bhand@gmail.com
sayajiraogsps@gmail.com
संपर्क : (०२४०) २३३२६९२
९८८१७४५६०४

महाराजा सयाजीराव ज्ञानमाला : ई-बुक
संपादक : दिनेश पाटील
●
लेखक : धारा भांड मालुंजकर,
१, निवास ब्लॉसम,
शरणपूर त्र्यंबक लिंक रोड,
कॅनडा कॉर्नर, नाशिक -४२२ ००५
मो. ९८८१७४५६०८
●
मुद्रक : प्रिंटवेल इंटरनॅशनल प्रा.लि.
जी-१२, एमआयडीसी,
चिकलठाणा, औरंगाबाद
●
मुखपृष्ठ : महेश मोधे
●
वितरक : साकेत प्रकाशन प्रा. लि.
औरंगाबाद
●
किंमत : ४० रुपये

---

- मुंबई सार्वजनिक विश्वस्त अधिनियम, १९५० अन्वये
  संस्था नोंदणी क्र. एफ - २४५९६ (औ) दि. १-१२-२०१६
- या संशोधन-प्रकाशन प्रकल्पास दिलेली देणगी प्राप्तिकर कायद्याच्या
  कलम ८०जी अंतर्गत सवलतीस पात्र
- **12AA Reg.No - ITBA/EXM/S/12AA/2018-19/ 101507596(1) - 14-02-2019**
- **80 G Reg. No - ITBA/EXM/S/80G/2019-20/ 1018507877(1) - 30-09-2019**

# महाराजा सयाजीराव ज्ञानमाला निर्मितीमागील भूमिका



महाराजा सयाजीराव गायकवाड हे फक्त आधुनिक भारतातील सगळ्यात प्रागतिक राजे होते असे नाही तर भारतासारख्या बहुसांस्कृतिक देशाचे 'बौद्धिक नेतृत्व'च ते करत होते. धर्म, जात, तत्त्वज्ञान, शिक्षण, दातृत्त्व, संशोधन, शेती, उद्योग, आरोग्य, क्रीडा, साहित्य, संस्कृती, ललित कला, प्राच्यविद्या, पुरातत्त्व, आंतरराष्ट्रीय संबंध, स्वातंत्र्यलढा इ. मानवी समाजाच्या सर्व अंगांना कवेत घेणाऱ्या क्षेत्रात त्यांनी निर्माण केलेले मानदंड आजही भारतासाठी आदर्श आहेत. त्यामुळे ते आधुनिक भारताचे निर्माते आणि म्हणूनच खरेखुरे 'महानायक' सुद्धा आहेत.

महापुरुषांचे चिंतन हे फक्त इतिहासाच्या स्वप्नरंजनासाठी किंवा इतिहासाचा पोकळ अभिमान बाळगण्यासाठी करायचे नसते. आपल्या समकालीन जगण्यातील समस्यांची उत्तरे शोधण्यासाठी, आपला जीवनसंघर्ष सकारात्मक करण्यासाठीसुद्धा या महापुरुषांचे पुनर्वाचन आवश्यक असते. इतिहास जितका वस्तुनिष्ठपणे आपण वर्तमानाशी जोडू तितका आपल्या समाजाचा भविष्यवेध आपल्याला अचूकपणे घेता येईल.

महाराजा सयाजीरावांचा 'उदोउदो' करण्यासाठी महाराजा सयाजीराव ज्ञानमालेची निर्मिती केलेली नाही. आजच्या आपल्या धार्मिक आणि जातीय संघर्षावर, शेती-उद्योगातील संकटांवर मात करण्यासाठी तसेच समाज म्हणून आपल्यातील 'विसंवाद' कमी करून 'सुसंवाद' वाढवण्याच्या व्यापक भूमिकेतून ही महाराजा सयाजीराव ज्ञानमाला आकाराला आली. या निमित्ताने आपला तुटलेला इतिहास 'जोडून' वाचण्याची आणि त्यातून संवादाचे पूल उभारण्याची प्रेरणा सर्वांना मिळेल एवढे मात्र नक्की.

पहिल्या टप्प्यात साठ ई-बुक झाले आहेत.

**दिनेश पाटील**
संपादक
**महाराजा सयाजीराव**
**ज्ञानमाला ई बुक प्रकल्प**

**बाबा भांड**
सचिव
**महाराजा सयाजीराव गायकवाड**
**सं. आणि प्र. संस्था, औरंगाबाद**

●●●



श्रीगणेशाय नमः

के. रा. रा. बळवंत पांडुरंग उर्फ अण्णा किर्लोसकरकृत

# संगीत शाकुंतल

नाटकांतील पदांचें

## नोटेशन

( सचिन्हलेखन ).

हें पुस्तक

**शिवराम सदाशिव मनोहर,**

बडोदें येथील सरकारी गायन शाळेंतील माजी शिक्षक

व

संगीत मृच्छकटिक, संगीत सौभद्र आणि संगीत शापसंभ्रम नाटकांतील पदांचें नोटेशन–

कर्ते,

यांजकडून

श्रीमती सौ. महाराणी मातुश्री चिमणाबाई गायकवाड
यांचे हुकुमावरून तयार झालें

तें

बडोदें येथें

"बडोदा वत्सल" छापखान्यांत छापिलें.

( या पुस्तकावर सर्व प्रकारचा हक्क गायकवाड सरकारचा आहे. )

शके १८२२.

सन १९००.

महाराणी चिमणाबाई यांच्या हुकूमावरून १९०० साली प्रकाशित झालेले पुस्तक

# महाराजा सयाजीराव
# आणि
# बडोद्यातील संगीत शिक्षण

बडोद्यात १८२१ मध्ये थोरले महाराज सयाजीराव गादीवर आल्यावर प्रथम आठ गवई ठेवून कलावंत खात्याची सुरूवात झाली; परंतु खंडेराव महाराजांच्या कारकीर्दीपर्यंत त्याला स्वतंत्र खात्याचे स्वरूप आलेले नव्हते. सर्व गुणिजनांचे म्हणजे सगळ्या कलाकारांचे एकाच खात्यात वर्गीकरण केले असल्यामुळे एकत्रच त्यांचा सर्व हिशेब ठेवला जाई. होनाजी बाळ, सगनभाऊ या प्रसिद्ध शाहिरांना बडोद्याच्या अधिपतींचा भरपूर आश्रय व मदत संस्थानातून मिळत होती. प्रसिद्ध कवी शाहीर अनंत फंदी हे तर बडोद्याचे वतनदार होते. खंडेराव महाराज या गुणिजनांना चांगला आश्रय देत. त्यानंतर राजमाता जमनाबाईसाहेबांनी ही परंपरा पुढे चालू ठेवली होती.

महाराज मल्हारराव गायकवाड यांच्या कारकीर्दीत खऱ्या अर्थाने संगीत क्षेत्रात सुधारणा करण्यात आल्या. कलावंताचे पगार जे पूर्वी निरनिराळ्या खात्यात जमा होत असत ते एकाच ठिकाणी जमा होण्याची योजना केली गेली. या खात्यासंबंधी

खाजगी कचेरीत एक कारकून नेमण्यात आला आणि या खात्याची देखरेख खाजगी सरदार यांच्याकडे सोपविण्यात आली.

पुढे मल्हाररावांनंतर महाराजा सयाजीराव-३ रे यांच्या काळात राजवाडा फौजदार खात्याची स्थापना करण्यात आली आणि सरदारांच्या देखरेखीखाली असलेले सर्व छोटे विभाग एकत्र करून राजवाडा फौजदार यांच्या ताब्यात दिले. त्याबरोबर कलावंत खातेही फौजदार खात्यात गेले. १८९९-१९०० पर्यंत हे खाते तिकडेच होते.

१८८७ मध्ये सयाजीराव पहिला विदेशी दौरा करून परत आले. यानंतर बडोदा संस्थानची कलाक्षेत्रात अनेकार्थी वृध्दी झाली. १८९७-९८ मध्ये सयाजीरावांनी पाश्चिमात्य संगीत शास्त्राची माहिती करून घेण्यासाठी प्रसिध्द गवई मौलाबक्ष यांचे चिरंजीव अल्लाउद्दीन यांस विलायतेस पाठवले. अल्लाउद्दीन तेथून पाश्चिमात्य संगीताचा अभ्यास करून आल्यावर १९०० मध्ये त्यांना ‘कलावंत सुप्रिन्टेन्डेन्ट’ असा हुद्दा देऊन कलावंत खाते स्वतंत्रपणे त्यांच्याकडे सोपविले. १९०० ला स्वतंत्रपणे सुरू झालेले हे खाते १९१२-१३ पर्यंत चालू राहिले. १९१८-१९ मध्ये हे खाते डायरेक्टर ऑफ म्युझिक आणि भारतीय संगीत शाळेचे प्रिन्सिपॉल यांच्या ताब्यात दिले गेले. या खात्याचे कागदपत्र अगदी स्वतंत्रपणे हुजूर हुकमाप्रमाणे ठेवण्यात आले होते.

जगप्रसिध्द कलावंत संगीतकार उस्ताद मौलाबक्ष खाँ, उस्ताद फैजमहंमद खाँ, उस्ताद फैयाज खाँ, गायनाचार्य पं. भास्करबुवा बखले, उस्ताद अब्दूल करीम खाँ, अब्दूल हक्क, गायनाचार्य पं. विष्णू भातखंडे, गायनाचार्य पं. विष्णू मिरजकर (पलुसकर), गायिका लक्ष्मीबाई जाधव बडोदेकर, पं. बालगंधर्व, महान चित्रकार राजा रवी वर्मा, चित्रपट सृष्टीचे जनक दादासाहेब फाळके, इटालियन मुर्तिकार फेलिची, फॅमटन, महान शिल्पकार कोल्हटकर, अशा महान जगप्रसिध्द कलावंत मंडळींच्या प्रगतीचा पाया बडोद्यात रोवला गेला आहे. हे महाराजा सयाजीराव कलासक्त असल्याचे मोठे उदाहरण होय. साहित्य संगीत कला विहीनः हे बोधवाक्य सयाजीराव महाराजांनी स्वतःच्या राजवटीत सार्थ करून दाखविले.

## कलासक्त आणि सुधारणावादी सयाजीराव

कलासक्त सयाजीरावांनी आपल्या कारकिर्दीत कलावंत खात्याची पुर्नरचना केली. १९२५ मध्ये त्यांनी कलावंत खात्यासाठी नियम आणि या खात्याची स्वतंत्र व्यवस्था या संदर्भात अमंलबजावणी करण्यास सुरुवात केली. यामुळे कलावंत खाते बडोद्याच्या सुधारणेत अग्रस्थानी राहिले आहे. महाराज सयाजीराव हे कला आणि कलावंत यांचे पोशिंदे बनले.

महाराजांनी १८८८ मध्ये शास्त्रीय शिक्षणाची पुस्तके गुजराथी भाषेत तयार करण्यासाठी ५०,००० रू. (आजची किंमत २०२१ मध्ये १३ कोटी रूपये) रक्कम मंजूर करून त्याबद्दलची सर्व जबाबदारी प्रो. त्रिभुवनदास गज्जर यांच्याकडे सोपवली. या

ग्रंथमालेतून निरनिराळ्या शास्त्रांवरील ग्रंथ तयार करण्यात आले. १८९३ ला सरकारमार्फत विद्वान लोकांना नोकरीत ठेऊन त्यांच्याकडून ग्रंथ लिहून घेण्याची व्यवस्था करण्यात आली.

## उस्ताद मौलाबक्ष खाँ आणि उस्ताद फैजमहंमद खाँ बडोद्यात, १८८६

इतिहासकार गोविंद सखाराम सरदेसाई यांची १८८९ मध्ये सयाजीरावांचे खाजगी चिटणीस म्हणून नेमणूक झाली. त्यांना बडोद्याच्या असंख्य सांस्कृतिक कार्यक्रमांची आणि कार्यकर्त्यांची बारकाईने पहाणी करून त्यांचा वृत्तांत महाराजांसमोर सादर करावे लागे. एकदा बडोद्याचे दोन गवई महाराजांना भेटायला आले. एकाचे नाव मौलाबक्ष व दुसऱ्याचे फैजमहंमद. दोघांच्या गायन शाळा होत्या. त्यासाठी जागा,



Ustad Maula Bakhsh

उपकरणे, खर्च इत्यादी अडचणी सांगण्यासाठी ते महाराजांना भेटायला आले होते. सयाजीराव निरनिराळ्या लोकांकडून कलावंतांचा पूर्ण तपास केल्याशिवाय कोणाही एकट्यावर विश्वास ठेवत नसत. त्याप्रमाणे या दोघांचाही तपास करून त्यांनी दोघांनाही जमेल तशी मदत केली होती.

महाराजांशी झालेल्या भेटीत फैजमहंमद खाँ महाराजांना म्हणाले, "मला माझ्या गायन कसबाचा एवढा अभिमान वाटतो, की वाटेल त्या नवशिक्याला पंधरा दिवसांत मी सतार व गायन ह्याची गोडी लावू शकतो."

त्यावर महाराजांनी "माझे सेक्रेटरी सरदेसाई ह्यांना गायनाभिरुची लावून द्याल, तर मी तुमचे बोलणं सत्य मानीन,' असे लगेच फैजमहंमदांना शब्दात अडकवले.

सरदेसाईंकडे गायन शिकायला वेळ नव्हता. त्यांनी आपले बंधू नारायणराव यांना खाँसाहेबांकडे गाणे शिकायला पाठवले. नारायणराव ठरल्या प्रमाणे फैजमहंमद यांच्याकडे पंधरा दिवस गेले आणि पुढे आ-मरण संगीताभ्यासी बनले. यामुळे महाराजांवर फैजमहंमदांची कायमची छाप पडली. फैजमंहमदांकडे तेव्हा भास्करबुवा बखले, नानांचे बंधू गणपतराव व डॉ. दिनकरराव आणि मुलगा श्यामकांत गायन शिकायला जाऊ लागले. चित्रपटसृष्टीचे जनक दादासाहेब फाळके हे बडोद्यात वास्तव्यास असताना उस्ताद मौलाबक्ष खाँ यांच्या गायनशाळेत शास्त्रीय गायन शिकले.

## पं. भास्करबुवा बखले आणि बडोदा, १८९०

भास्करबुवा बखले, म्हणजे भास्कर रघुनाथ बखले हे मराठी हिंदुस्थानी संगीत परंपरेतले गायक, संगीतकार होते. त्यांचा जन्म सुरतजवळील कठोर या गावी झाला. फैजमहंमद खाँसाहेबांना १८९० पूर्वीच बडोदे सरकारने शाळा चालविण्यास जागा देऊन सर्व व्यवस्था केली होती. दरबारी गायक म्हणून त्यांना खर्चासाठी चाळीस रूपये महिना मिळत असे. त्याचबरोबर शाळेचे संचालक म्हणून अधिक चाळीस रुपये मिळत होते. उस्ताद फैजमहंमद




खाँचे पट्टशिष्य व मदतनीस शिक्षक म्हणून भास्करराव बखले या तरूण गायकास प्रथम दरमहा दहा व पुढे एक वर्षाने पंधरा रूपये पगार मिळू लागला. भास्कररावांचे शिक्षण खाँसाहेबांकडे दोन वर्ष केवळ प्राथमिक तयारीचे झाले. नंतर गावातल्या महत्त्वाच्या गाण्याच्या मैफलींना फैजमहंमद खाँ भास्करबुवा बखलेंनाही घेऊन जायला लागले होते.

यापूर्वी १८८४ साली मौलाबक्षांच्या शाळेचा वार्षिक समारंभ झाला. समारंभाचे अध्यक्ष गजाननराव भाटवडेकर सरसुभे हे होते. बडोद्यातली गायन-वादनातली सर्व मातब्बर मंडळी या कार्यक्रमाला हजर होती. भास्कर बखले यांचेही त्यावेळी गायन झाले. भास्करबुवांच्या खड्या आवाजाने सर्वांची मनं जिंकून घेतली होती. 'सयाजी-विजय' पत्रकात या कार्यक्रमाचे वृत्त छापले होते. 'किर्लोस्कर कंपनी' चा मुक्काम त्यावेळी पनवेलला होता. त्यावेळी तालीम सुरू असलेल्या राम-राज्य-वियोग या नाटकातील प्रमुख भुमिका गायक नट भाऊराव कोल्हटकर हे बडोद्याचे होते. त्यामुळे सयाजी-विजय वृत्तपत्र भाऊराव कोल्हटकरांतर्फे किर्लोस्कर कंपनीत नियमित येत असे. या योगामुळे बडोद्यातील मौलाबक्षांच्या शाळेचे बक्षीस समारंभाचे वृत्त आणि किशोर गायक भास्कर बखले यांच्या असामान्य गाण्याचे वर्णन अण्णासाहेब व भाऊराव कोल्हटकरांच्या वाचनात आले होते.

## पंडीत विष्णू दिगंबर मिरजकर (पलुसकर) बडोद्यात

भारतीय गायन संस्कृतीमध्ये प्रसिध्द असलेले विष्णू दिगंबर मिरजकर (पलुसकर) हे बडोद्याला असताना घडलेला एक प्रसंग. राजमाता जमनाबाईंच्या इच्छेनुसार कार्तिक पौर्णिमेच्या रात्री दरबारच्या गुणिजनखात्यातल्या सर्व गवय्ये आणि वादकांची शिवमंदिरात एक मोठी मैफील भरली. या मैफीलीत मिरजकरबुवांनीही गायन करावे अशी जमनाबाईंची इच्छा होती.

तरुण मिरजकरबुवांचा स्वर उंच व चौथ्या पट्टीचा असे. या वरच्या पट्टीत मर्दानी व पहाडी आवाजात गायलेले बुवांचे गाणे सर्व लोकांना खूप आवडले. लोक या गाण्याने मंत्रमुग्ध होऊन गेले. त्यानतंर मौलाबक्ष खाँचे आणि शेवटी फैजमहंमद खाँचे गाणे झाले.

फैजमहंमद खाँची मैफील संपणार तेवढ्यात श्री. गणपतीबुवा ब्रम्हचारी तेथे हजर झाले. या साधूंना राजमाता जमनाबाई गुरुस्थानी मानीत असत. गणपतीबुवांनी मिरजकरांचे गाणं



ऐकण्याची इच्छा प्रकट केली. परंतु सर्वात जेष्ठ गवई गायल्यानंतर कोणालाही गाता येत नसल्याच्या रिवाजमुळे फैजमहंमद खाँनी मीच गाणे ऐकवतो असे गणपतीबुवांना सांगितले. त्यावर गणपतीबुवांनी फैजमहंमद खाँचे गाणे अनेकदा ऐकले असल्याने मिरजकरांचेच गाणे ऐकण्याचा हट्ट केला. गणपतीबुवांच्या इच्छेप्रमाणे जमनाबाईंनी दिलेल्या आदेशानुसार मिरजकरबुवांनी गाणे सुरू केले, आणि बघता बघता मैफील रंगात आली. चाहत्यांकडून वाहवा मिळू लागली. खुद्द राजमाता जमनाबाईसमोर त्यांची मैफील रंगल्याने पुढे त्यांना याचा खूप फायदा झाला.

आजही ज्यांच्या नोटेशन्स वापरून विद्यार्थी शास्त्रीय गायन शिकतात ते संगीत पंडीत विष्णु दिंगबर पलुसकर हे महाराजांनी भरविलेल्या पहिल्या संगीत परिषदेत हजर होते. परंतू या परिषदेत इंग्रजी भाषेचा केलेला अधिक वापर पलूसकरांना आवडला नाही. त्यांच्या मताप्रमाणे परिषद सर्वांना समजेल अशा भाषेत व्हायला हवी होती. त्यामुळे ते तिथे रमले नाहीत असे संदर्भ सापडतात. परंतू महाराजांनी पं. पलुसकर व पं. भातखंडेना कलाभवनच्या संगीत विभागाच्या औपचारीक तपासणीसाठी (inspection) बोलावले होते. दोघेही तेव्हा बडोद्यात येऊन तपासणी करून गेले होते. अशा पंडित पलुसकरांसंदर्भातील नोंदी पहिल्या संगीत परिषदेच्या अहवालात सापडतात.


## उस्ताद अब्दुल करीम खाँ आणि अब्दुल हक्क बडोद्यात, १८९४

उस्ताद अब्दुल करीम खाँ हे असे गवई होऊन गेले की, ज्यांच्या नावाचा उच्चार हीच संगीत शौकिनांमध्ये एक जादू मानली जात असे. त्यांच्या उमेदीच्या काळात सयाजीरावांनी त्यांना राजाश्रय दिला. पुढे त्यांना ‘बडोदा दरबार गवई’ हे स्थान प्राप्त झाले. बडोद्याच्या वास्तव्यात खाँसाहेबांनी महाराजांवर आपल्या गायनकलेचा चांगला प्रभाव पाडला होता.

अब्दुल करीम खाँ आणि अब्दुल हक्क खाँ हे दोघे बंधू भावनगरहून बडोद्यास आले. या दोघा बंधूंचे गाणे आणि संगीताप्रति श्रध्दा जाणून महाराजांनी त्यांना दरबारात नोकरी

देण्याची इच्छा व्यक्त केली. या दोघांनी नम्रपणे ती स्वीकारली. येथे महाराजांची दूरदृष्टी दिसून येते. हेच अब्दुल करीम खाँ पुढे जगप्रसिद्ध गायक बनले.

दरबारी नोकरीत रूजू होताच त्यांना जनानखान्यातील गाण्याची आवड असलेल्या स्त्रियांना गाणे शिकवायला जावे लागे. शिवाय दरबारात गायनही करावे लागे. हे काम एकट्या अब्दुल करीम खाँना करावे लागे. मैफिलीत मात्र दोघे बंधू गात असत. जनानखान्यातून या दोघांची आणि त्यांच्या गाण्याची तारीफ महाराजांच्या कानावर गेली होती. त्यामुळे लवकरच या दोघांचे गाणे खासगीत दिवाणखान्यात



महाराजांसमोर झाले. या दोघा बंधूंनी आळीपाळीने गायन करून मैफील गाजविली. महाराजांनी खुश होऊन त्यांना बक्षीस म्हणून पाचशे रूपये, भरजरी शाल आणि अब्दुल हक्कला भरजरी टोपी दिली.

१८९४ साली उस्ताद अलिया-फत्तु खाँ, पतियाला महाराजांची शिफारस घेऊन बडोद्यास आले. उस्ताद अलिया-फत्तु खाँना मैफीलीत वेडेवाकडे हातवारे करण्याची सवय होती. पण महाराज शिस्तप्रिय असल्याने त्यांना हे प्रकार आवडणार नाहीत याची कल्पना दरबारातून या गवयांना देण्यात आली. त्यानंतर महाराजांसमोर अलिया-फत्तु खाँपैकी अलिया खाँची बडोद्यात लागोपाठ सकाळी, संध्याकाळी, रात्री अशी तीन गाणी झाली. मात्र ही गाणी त्यांच्या ख्यातीप्रमाणे जमली नाहीत. याचे कारण म्हणजे त्यांच्या सवयीवर दरबाराने घातलेले बंधन.

महाराजांच्या शिस्तप्रिय स्वभावातून हे महान गायकही सुटले नाहीत. अदब राखून गाणे सादर करणे हे शिष्टाचाराला धरून व्हावे; ह्या गोष्टीला बडोदा दरबारी सर्वांत वरचे स्थान होते. त्यांचे गाणे संपल्यावर महाराजांनी दिवाणांना जवळ बोलावून विचारले की आपल्या दरबारात कोणी असे गाऊ शकेल का? गवयांच्या प्रथेनुसार महान गायकांच्यावर कुणी गायचे नसते. त्यामुळे दरबारात मौलाबक्ष खाँ आणि फैजमहंमद खाँनीही महाराजांना हात जोडून नकार दर्शवला. त्यामुळे महाराज नाराज झाले आणि त्यांनी अब्दुल करीम व अब्दुल हक्कला गाण्याची आज्ञा दिली. महाराजांच्या आज्ञेनुसार दोघा भावांनी बहारदार गाणे पेश केले. त्यांची नम्रता आणि पेशकश पाहून महाराजांना खूप आनंद झाला. सयाजीरावांनी त्यावेळी केलेल्या भाषणात त्या दोघांचे भरभरून कौतुक केले.

काही दिवसानंतर दरबारातून उस्ताद अब्दुल करीम खाँना १५० रु. आणि अब्दुल हक्कला ८० रु. नियमित मिळू लागले, त्यांच्यावर दरबार गवई म्हणून शिक्कामोर्तब झाला. याचबरोबर राजवाड्यातील स्त्रियांना, राजपुत्रं आणि राजकन्येला गाणे शिकवायचे कामही उस्ताद अब्दुल करीम खाँकडे महाराजांनी सोपविले. प्रसिद्ध गायिका हिराबाई बडोदेकर या उस्ताद अब्दुल करीम खाँ यांच्या कन्या होत.

## बडोदे संगीत महाविद्यालय (अ‍ॅग्लो व्हर्नाक्युलर शाळा), १८९६

महाराजांनी बडोद्यात सर्व जाती-धर्मांच्या मुला-मुलींसाठी प्राथमिक शिक्षण सक्तीचे केले. त्यासाठी अ‍ॅग्लो व्हर्नाक्युलर ही शाळा बांधण्यात आली. उस्ताद मौलाबक्ष खाँसाहेब यांना महाराजांचा राजाश्रय होता. महाराजांच्या हुकुमावरून बडोद्यात नुकतीच उस्ताद यांनी गायन शाळा सुरू केली होती. या गायनशाळेचे वर्ग नंतर या अ‍ॅग्लो व्हर्नाक्युलर शाळेत भरू लागले. २६ फेब्रुवारी १८९६ ला त्याचे संगीत महाविद्यालयात रुपांतर करण्यात आले. याचे प्राचार्य उस्ताद मौलाबक्ष खाँ साहेब होते. हे महाविद्यालय आजही हे उत्तमरित्या चालू आहे.

महाराजांनी हे संगीत महाविद्यालय कलाभवनाचा स्थापनेपूर्वी संगीत कलेला प्रोत्साहन व शास्त्रशुध्द बैठक देण्यासाठी सुरू केले होते. या संगीत महाविद्यालयामध्ये गायनाबरोबर वादन व



1875:- Anglo-Vernacular School Now Music Collage

नृत्य तसेच नाट्यकलेला देखील जतन करून त्याचे शास्त्रशुध्द अभ्यासक्रम चालू केले आणि विद्यार्थ्यांना पदवी (Degree) आणि पदविका (Diploma Certificates) वर्ग चालू केले.

बरेच प्रसिध्द कलावंत या संगीत विद्यालयात माजी विद्यार्थी, शिक्षक, प्राचार्य म्हणून काम पाहून गेलेले आहेत. उस्ताद मौलाबक्ष खाँ, उस्ताद फैयाज खाँ, उस्ताद अब्दुल करीम खाँ, उस्ताद अत्ता हुसैन खाँ, उस्ताद सीदिकी हुसैन खाँ, उस्ताद नसर हुसैन खाँ, उस्ताद हजरत इनायत खाँ, गायनाचार्य पंडीत मधुसूदन जोशी, पंडीत विष्णू नारायण भातखांडे, ही काही संगीत विश्वातली अजरामर नावे आहेत. ही सर्व तज्ज्ञमंडळी एकेकाळी बडोद्यातल्या या संगीत शाळेशी जोडले गेलेले होते.

## उस्ताद फैयाज खाँ बडोद्यात, १९१५

महाराजांनी बडोद्यात नेहमीच प्रजेसाठी नवनवीन प्रयोग केले. रुग्णांना दवाखान्यात संगीत ऐकवले तर त्यांच्या तब्येतीत लवकर सुधारणा होऊ शकेल, या विचाराने बडोद्याच्या हॉस्पिटलमध्ये फैयाज खाँना गायनाचे आदेश दिले. महाराजांच्या आदेशानुसार फैयाज खाँ रोज गायन वर्गाव्यतिरिक्त रूग्णांची गायनाने सेवाही करू लागले. संगीत कलेचा आरोग्याशी संबंध जोडून महाराजांनी एक नवे धोरण आणि सुधारणा अवलंबली होती.

परंतु महाराजांचा हा प्रयोग फार दिवस चालला नाही. फैयाज खाँना कामाचा अधिक तान असल्याने महाराजांनी त्यांचे हे काम बंद केले. या बदल्यात त्यांना ज्युबली बागेत येणाऱ्या जनतेचे मनोरंजन करण्याचे काम सोपविले. हेच उस्ताद फैयाज खाँ पुढे हिंदुस्थानात एक महान प्रसिध्द गवई म्हणून नावारूपास आले. अखिल भारतीय गायनाच्या स्पर्धेत त्यांना बरीच सुवर्णपदकेही मिळाली होती.



## पंडीत विष्णू नारायण भातखंडे बडोद्यात, १९१५

बडोदे संस्थानात मौलाबक्ष खाँची गायनशाळा व्यवस्थित चालू होती. ते दक्षिणेकडून आल्यामुळे हिंदुस्थानी संगीताशिवाय कर्नाटक संगीताचे सुद्धा त्यांना थोडे ज्ञान होते. त्यांनी स्वत:ची एक

स्वरलिपी निर्माण करून त्या लिपीत काही गीते प्रसिद्ध केली होती. त्यांच्या हयातीत संगीत शाळा ठीक चालली होती. नंतर ती ओस पडली व महाराजांना तिच्या भविष्याविषयी चिंता वाटू लागली. संगीत संशोधक पं. विष्णू नारायण भातखंडे यांच्या कार्याची



माहिती महाराजांपर्यंत पोहचली होती. महाराजांनी संगीत शास्त्राचा अभ्यासक्रम नव्याने तयार करण्यासाठी भातखंडेंना या संगीत महाविद्यालयात येण्याचे निमंत्रण दिले. त्यानुसार भातखंडे १९१५ मध्ये बडोद्यात आले. त्यांनी या संगीत महाविद्यालयाच्या अभ्यासक्रमात बरेच बदल करून नोटेशनची पुस्तके तयार करून दिली आणि ती बडोदा सरकारने छापली.

विष्णू नारायण भातखंडे हे हिंदुस्थानी संगीताचे संशोधक, संगीतकार, गायक होते. बडोद्यात भातखंडे व महाराजांच्या काही भेटी झाल्या. या भेटीदरम्यान त्यांच्यात भारतीय संगीत या विषयावर चर्चा होत असे. एका भेटीत भातखंडेंनी महाराजांना अखिल भारतीय संगीत परिषद भरवण्याची कल्पना सुचविली.

महाराजांनी त्यांना लगेच परिषदेची योजना व निमंत्रणास योग्य अशा संगीत कलाकार व शास्त्री-पंडित यांची यादी तयार करण्यास सांगितले. त्यानुसार भातखंडेंनी परिषदेची योजना, निमंत्रण पाठवण्याच्या पाहुण्यांची यादी व तपशीलवार कार्यक्रम वगैरे तयार केले. २० फेब्रुवारी १९१६ ला बडोद्यास पहिली अखिल भारतीय संगीत परिषद तेथील कॉलेजच्या मध्य सभागृहात भरविली गेली. अखिल भारतीय संगीत परिषदेची कार्यकारी समितीसुद्धा या वेळी स्थापन करण्यात आली व पंडित भातखंडेंना सरचिटणीस म्हणून नेमले गेले. या परिषदेत भातखंडे यांनी आपला "A short historical survey of the music of Upper India" या विषयाचा इंग्रजी लेख वाचला. अर्वाचीन संगीताच्या इतिहासात पहिली अखिल भारतीय संगीत परिषद ही एक महत्त्वाची घटना होती.

त्यानंतर बडोद्याच्या गायनशाळेची पुर्नरचना भातखंडेंच्या नेतृत्वाने झाली. अखेरीस ही शाळा तेथील एम. एस. विश्वविद्यालयातील ललितकला शाखेचा एक भाग म्हणून विलीन झाली. बडोद्याचे दरबार गायक उस्ताद फैयाज हुसेन खाँ यांनी भातखंडे यांच्या सूचनेनुसार शाळेशी चांगला संबंध ठेवला होता. व ते तिचे वरचेवर भेट देणारे (guest lecturer) प्राध्यापकही राहिले होते.

१९३३ पर्यंत भातखंडे वर्षातून दोनतीन वेळा बडोद्यास भेट देत असत व तेथील संगीत शाळेचे वर्ग पाहत असत. या शाळेचा कारभार व प्रगती याबाबत ते आपला अहवाल नियमितपणे

सादर करीत असत. त्यांनी महाराजांच्या इच्छेनुसार आणि स्वत: श्रमपूर्वक आखून दिलेली शिक्षणपध्दती आज वस्तुत: सर्व संगीत विद्यालयातून शिकवली जाते. ही गोष्ट त्यांच्या कार्यसिध्दीस बळकटी आणणारी आहे.

डॉ. श्रीकृष्ण नारायण रातंजनकर यांना हिंदुस्थानी संगीताच्या शास्त्रीय व क्रियात्मक शिक्षणासाठी भातखंडेंचे मार्गदर्शन लाभले. त्यांनी १९७१ ते १९२२ पर्यंत डॉ. रातंजनकरांची नियुक्ती बडोदा संस्थानचे विद्वान गायक मरहूम उस्ताद फैयाझ हुसेन खाँ यांच्याकडे केली होती. भातखंडेंच्या शिफारसीवरुन रातंजनकरांना सयाजीरावांकडून महिना चाळीस रुपये शिष्यवृत्ती मिळाली. महाराजांनी घातलेल्या अटींनुसार फैयाझ खाँ यांच्याकडे संगीताची तालीम आणि शाळा-कॉलेजचे पारंपरिक शिक्षण हेही चालू ठेवले. भातखंडे यांनी तयार केलेल्या स्वरलिपीचेही ज्ञान त्यांनी मिळवले.

## महाराजांची भातखंडेंकडून गायनशास्त्र ग्रंथ निर्मिती

भातखंडेंनी हिंदुस्थानी शास्त्रीय संगीताच्या वर्गीकरणाची जी थाट पद्धत विकसित केली होती आणि एक नवीन पध्दतीचे स्वरलेखन (नोटेशन) तयार केले होते, ते महाराजांनी बडोद्यात गायनशाळांतून चालविण्याची व्यवस्था केली. त्याचबरोबर महाराजांनी भातखंडे यांच्याकडून गायनशास्त्रावरील पुस्तके लिहून घेतली. या कामासाठी भातखंडेंनी बडोदा व हिंदुस्थानच्या

सर्व प्रांतात फिरून गायनशास्त्रातील प्राचीन ग्रंथ मिळविले. त्याचा गाढा अभ्यास करून त्यावर नवीन ग्रंथ लिहिले. काही महत्त्वाच्या ग्रंथांची यादी खाली दिली आहे.

१. 'संस्कृत लक्षसंगीत' या ग्रंथात प्रचलित हिंदुस्थानी संगीतातील रागांची संपूर्ण माहिती देऊन त्याबद्दल चर्चा केली आहे.

२. संस्कृत अभिनवरागमंजिरी

३. 'हिंदुस्थानी संगीत पद्धती' भाग १-४ ही पुस्तके मराठीत असून, यात विद्यार्थ्यांसाठी रागांचे उत्तम विवरण केले आहे.

४. हिंदुस्थानी संगीत क्रमिक पुस्तकमाला भाग १-४ या पुस्तकात हिंदुस्थानातील प्रसिद्ध गायकांच्या उत्कृष्ट चिजा नोटेशनसह निरनिराळ्या रागात आणि तालात दिलेल्या आहेत. ही पुस्तके हिंदुस्थानातील सर्व भागातल्या संगीत पाठशाळेतून क्रमिक पुस्तके म्हणून प्रचलित आहेत.

## पहिली अखिल भारतीय संगीत परिषद बडोदे, १९१६

गायनकलेला महाराजांनी आपल्या कारकीर्दीच्या आरंभापासून उत्तेजन दिले होते. तिचा प्रसार अधिक विस्तृत प्रमाणावर होण्यासाठी व भिन्न भिन्न संगीत संप्रदायांच्या तज्ज्ञांना एकत्र आणून त्यांना परस्परांशी विचारविनिमय करण्याची संधी देण्यासाठी महाराजांनी २० फेब्रुवारी १९१६ ला पहिली अखिल भारतीय संगीत परिषदेची बैठक बडोद्यास भरविली.

बडोद्यात या संगीत परिषदेचे दरवर्षी आयोजन केले जाऊ लागले. भारताच्या सगळ्या प्रांतातून गायक, सितारवादक, तबलजी, बासरीवादक, नर्तक, जादूगार, नकलाकार तसेच नामांकित नाटक कंपन्या आापल्या प्रतिभेचे दर्शन लोकांपुढे करण्यासाठी मोठ्या संख्येने बडोद्यात जमा होत. कालांतराने या महोत्सवाला "बडोदा संगीत महोत्सव" म्हणून ओळखले जाऊ लागले. या महोत्सवाने होळी सणात केली जाणारी बुराई, बीभत्सना, शिवीगाळ आणि अश्लीलता तसेच अडाणी असभ्यता या सगळ्यांची जागा आता कुशल प्रतिभासंपन्न कलावंतांच्या कलेच्या सादरीकरणाच्या निखळ आनंद उपभोगण्याने घेतली.

२० फेब्रुवारी १९१६ ची अखिल भारतीय संगीत परिषद तीन दिवस चालली. लखनौचे ठाकूर नवाबअली-खाँसाहेब परिषदेचे अध्यक्ष होते. या परिषदेत अखिल भारतातून आलेल्या विद्वान लोकांनी भारतीय संगीत या विषयावर लिहिलेले निबंध वाचले. यामध्ये क्लेमेंटने "भारतीय संगीतातील स्वरलिपी" या विषयावरील आपला लेख वाचला. तर श्री. के. बी. देवल, आय. सी. एस यांनीही आपले लेख वाचले. या लेखांवर बौध्दीक चर्चाही झाल्या. त्याचबरोबर भारतातील दिग्गज सर्वश्रेष्ठ संगीतकारांनी आपल्या कलेचे सादरीकरण केले.

या परिषदेमध्ये पं. विष्णू नारायण भातखंडे, पं. विष्णू मिरजकर (पलुसकर), उदयपूरचे फकिरूद्दीन खाँ, अल्वरचे मुजफ्फर खाँ, टोंकचे हुसेन खान, इंदूरचे इमदाद खाँ, जयपूरचे कल्लन खाँ

आणि अलीहुसेन खाँ, खुद्द बडोद्याचे फैजमहंमद खाँ, मौला बक्ष खाँ आणि फैयाज खाँ या प्रसिद्ध कलाकारांचा समावेश होता.

या संगीत परिषदेसाठी भारताच्या विविध राज्यांतून संगीततज्ज्ञ आले होते. ही घटनाच सिध्द करते की चित्रकलेच्या क्षेत्राप्रमाणेच भारतीय शास्त्रीय संगीताला सयाजीरावांसारख्या संस्थानिकांनी ब्रिटिश सत्तेच्या सापेक्ष काळातही वाचवली होती, नव्हेतर अजून सुधारीत करून त्याला राजाश्रय देऊन कलाकारांचा सन्मान वाढविला होता. त्यामुळे महाराजा सयाजीरावांना ललितकलेबद्दल असलेली आस्था आणि त्यांनी त्यासाठी केलेली प्रचंड आर्थिक मदत हे त्यांच्या सुधारणावादी कलासक्त स्वभावचा एक पैलू आहे, असे म्हटले तर वावगे ठरणार नाही.

## बालगंधर्व आणि बडोदा राजाश्रय, १९१९

बालगंधर्व म्हणजे नारायण श्रीपाद राजहंस (देशपांडे) यांच्या गाणाऱ्या गळ्यानं कित्येक पिढ्यांना रिझवलं, खुलवलं आणि फुलवलं आहे. संगीत नाटकात आज त्यांचे नाव अजरामर झाले आहे. नारायण राजहंसचे स्वर ऐकून लोकमान्य टिळकांनी त्यांना "बालगंधर्व" ही उपाधी बहाल केली. बालगंधर्वांचा जन्म पुण्यात २६ जून १८८८ रोजी झाला. १९११ पर्यंत गंधर्वांची कीर्ति सर्वत्र पसरली होती आणि १९१३ साली त्यांनी 'गंधर्व नाटक मंडळी' ची स्थापना केली.

मुंबईत येथे आलेल्या बडोद्याच्या रावसाहेब शिरगावकरांना बालगंधर्वांनी सयाजीरावांचा राजाश्रय मिळवून देण्याची विनंती

केली. शिरगावकरांनी गंधर्व कंपनीची माहिती काढून राजाश्रयास योग्य असल्याची खात्री झाल्यावर महाराजांकडे गंधर्व कंपनीची शिफारस केली. त्यांना बडोदा संस्थानचा राजाश्रय मिळाला. बालगंधर्व महाराजांची आज्ञा होईल त्याप्रमाणे वर्षातून एक महिना बडोद्यास जात असत. लोकप्रियतेमुळे त्यांची नाटकं बडोदा दरबारीही रंगू लागली. महाराजांकडून गंधर्व कंपनीला ५००० रु. वर्षासन मिळू लागले.

बालगंधर्व बडोद्यात जात तेव्हा त्यांचा पहिला नाट्यप्रयोग राजवाड्यात खाजगीत होत असे. तेव्हा त्यांना एक हजार रूपये देऊन महाराज त्यांचा सन्मान करीत असत. त्यांच्या सर्व सहकलाकारांनाही तेवढाच मान दिला जाई. त्यांच्या सन्मानार्थ महाराज चार हजार रूपये देत असत. महाराजांच्या कुटुंबातल्या स्त्रियांकडून बालगंधर्वांना किमती शालू भेटीदाखल मिळत असत. याखेरीज दरवर्षी महाराज गंधर्व नाटक मंडळीवर दहा ते पंधरा हजार रुपये खर्च करीत असत. यासंदर्भात बालगंधर्व आपल्या आत्मचरित्राच्या टिपणात म्हणतात, “अशी विशुध्द, निरपेक्ष रसिकता आणि औदार्य आता दुर्लभच!” महाराजांनी बालगंधर्वांच्या नाटक कंपनीला “श्री. म. सयाजीराव गायकवाड राज्य बडोदे यांचा खास आश्रयाखाली” अशी जाहिरात करण्याची अनुमती दिल्याबद्दल बालगंधर्वांना याचा नेहमी अभिमान वाटत असे.

गंधर्व कंपनीने दरवेळेस नवीन प्रयोग दाखविला पाहिजे असा महाराजांचा नियम होता. १९१७ च्या सुमारास राम गणेश गडकरी

यांनी लिहिलेल्या 'एकच प्याला' या मद्यपानाशी संबंधित मराठी नाटकाचा पहिला प्रयोग २० फेब्रुवारी १९१९ ला गंधर्व नाटक मंडळीने बडोद्यात केला. महाराज नाट्यसंगीत ऐकण्यास बसत



परंतु महाराणी चिमणाबाईंना मात्र संगीताचा खरा शौक होता. त्या स्वत: सतार वाद्य वाजवित असत. बालगंधर्वांच्या चोळ्या महाराणी चिमणाबाईंना फार आवडत असत. त्या बालगंधर्वांचे

ब्लाऊज गुपचूप राजमहालात मागवून घेत. चोळ्यांची शिलाई कशी आहे हे चिमणाबाई स्वत: बघत आणि तसेच ब्लाऊज बनवून घेत असत.

बालगंधर्वांनी साकारलेली महाराष्ट्रीयन स्त्री आणि तिची वेषभूषा ही राजा रवी वर्मांच्या सुरुवातीच्या लोकप्रिय चित्रांवरून आणि बडोद्यातील वास्तव्यात प्रत्यक्ष निरीक्षणातून घेतली असल्याचे नाकारता येत नाही. या फॅशन त्यावेळेस महाराष्ट्रात प्रचलित नव्हत्या त्या बालगंधर्व बडोद्यात राहून आल्यानंतर लोकप्रिय झाल्या अश्या नोंदी सापडतात. त्यामुळे बालगंधर्वांच्या वाढत्या लोकप्रियतेमध्ये बडोदा वास्तव्याचा मोठा वाटा मानला जातो. खुद्द बालगंधर्व सयाजीरावांना आपले दैवत मानत असत.

## गायिका लक्ष्मीबाई जाधव बडोद्यात, १९२४

कोल्हापूरच्या लक्ष्मीबाई जाधव या प्रसिध्द गायिका बडोदा दरबारात १९२४ ते १९४४ पर्यंत होत्या. लहानपणीच आई-वडीलांचे छत्र हरपलेल्या लक्ष्मीबाईंना मावशीकडे रहावे लागले. मावशींच्या यजमानांना गाण्याची आवड होती. त्यामुळे लक्ष्मीबाईंना त्यांनी चांगला गुरू शोधून दिला. लक्ष्मीबाईंनी १९१७ साली अल्लादिया खाँसाहेबांचे बंधू हैदर खाँ यांच्याकडे गायनाचे धडे शिकायला सुरुवात केली. लक्ष्मीबाईंचा आवाज खूप मधूर आणि नाजूक होता. लक्ष्मीबाईंनी शास्त्रीय संगीताचा खूप अभ्यास करून आपली दृष्टी व्यापक केली होती.

सयाजीराव महाराजांना पहिल्या महाराणी चिमणाबाईंच्या अचानक जाण्याचे प्रचंड दु:ख होऊन निद्रानाशाचा आजार

जडला. खूप उपचार, औषधपाणी अन् प्रचंड ग्रंथ वाचनानेही या विकारावर आराम वाटेना. त्यांना रात्र रात्र झोप लागत नसे. त्यांना स्वस्थ झोप येण्याकरीता बऱ्याच गायकांना रात्री अंगाईगीत गाण्यासाठी बोलावण्यात येई. तेव्हा कोणालाच



यश आले नाही. महाराजांनी कोल्हापूरच्या गायिका लक्ष्मीबाईंचे गायन ऐकले आणि त्यांना चांगली झोप आली. दुसऱ्याच दिवशी दरबार गायिका म्हणून त्यांची नेमणूक झाली. महाराजांनी त्यांना भरजरी वस्त्र आणि अलंकार देऊन यथायोग्य सन्मान केला. त्यांना दरबारात येण्यासाठी बग्गीची व्यवस्था केली होती. बडोद्यातल्या यशस्वी कारकिर्दीमुळे त्या "लक्ष्मीबाई बडोदेकर" याच नावाने ओळखल्या जाऊ लागल्या. प्रयागच्या संगीत परिषदेतही त्यांचे गायन गाजले. शंकराचार्य डॉक्टर कुर्तकोटींनी त्यांना 'संगीत चंद्रिका' ही पदवी बहाल केली होती. तसेच त्यावेळी लक्ष्मीबाईंच्या गायनांच्या ग्रामोफोनमध्ये अनेक रेकॉर्ड्स निघाल्या. त्यावरून त्यांच्या सुरेल व मधुर गायनाची कल्पना येते.

## कलावंत खात्याची अंतरव्यवस्था नियम , १९२५

१९२५ मध्ये "कलावंत खात्याच्या अंतरव्यवस्थेसंबंधी नियम" हा ग्रंथ बडोदे सरकारी छापखान्यात छापला. कलावंत खात्याचे हे नियम वाचल्यावर आपल्याला कलासक्त सयाजीरावांच्या अथांग सुव्यवस्थापनाची ओळख होते. या खात्याचे व्यवस्थापन खूप नियमबद्ध आणि बारकाईने केले होते. गवई, वादक, नर्तकी, भांड (नकलाकार) किंवा तमाशा करणारे कलावंत या सर्वांच्या दरबार निवडीसाठी खास कायद्याचा आधार असलेल्या नियम व अटी तयार करण्यात आल्या होत्या. त्यातील गवई नेमणूकीचे नियम पुढीलप्रमाणे,

१. तो चांगल्या घराण्यात शिकलेला असून निर्व्यसनी असावा.

२. त्याचा आवाज मधूर असावा.

३. तो सशक्त असून कुरूप नसावा.

४. तो ख्यालिया अथवा धृपदिया असावा.

५. त्याला गायनाची शास्त्रीय माहिती असून सदरहूचे सांकेतिक लेखनही अवगत असावे.

६. त्यास रागांचे गायन व व्यावहारिक गायनही येत असावे.

७. त्यास उभे राहूनही गाता यावे.

याशिवाय सर्व दरबारी गवयांसाठी काही विशिष्ट नियमही करण्यात आले होते. त्यामध्ये, १) गवई लोकांना गाण्याच्या वेळी तबला आणि जरूरीप्रमाणे तंबोऱ्याची आणि सारंगीवाल्याची साथ सरकारांकडून देण्यात यावी. २) मुसलमान गवयांस

मोहरमच्या दहा दिवसात आणि बकरी ईद व रमजान ईद ऐकेक दिवस रजा देण्यात यावी. ३) गवई लोक नियमाप्रमाणे सर्व प्रकारच्या शिक्षेस पात्र आहेत. ४) गवई लोकांना नियमाप्रमाणे निवृत्तिवेतन किंवा निवृत्ती पारितोषिक देण्यात यावीत. मात्र त्यांचे वय ५५ वर्षांचे झाल्यावर त्यांना हुजूर मंजुरी शिवाय नोकरीत ठेवू नये. ५) गवई लोकांना सरकारी नोकरीत अडचण न येता अशा रीतीने कोणाकडे गाण्यास जाण्याची मोकळीक आहे. गवई लोक सरकारी कामगिरीच्या निमित्ताने बाहेरगावी गेल्यास त्यांना मुलकी नियमाचे धोरणाने भत्ताभाडे देण्यात यावे.

## बडोदा संगीत शिक्षण आणि सुधारणा

जानेवारी १८९५ ला महाराज परदेशातून सुखरूप परत येण्याच्या आनंदात समारंभाचे आयोजन केले होते. या समारंभानंतर महाराजांनी आपल्या महालात इलियट, फ्रेडरिक, अब्बास तैय्यबजी, हकिम शमशुद्दीन, मौलाबक्ष खाँ, फैजमहंमद खाँ आणि त्यांचे छोटे गवई अब्दुल करीम खाँ व अब्दुल हक्क यांना बोलावून १८९६ मध्ये होणाऱ्या इंग्लंडच्या राणीच्या हीरकमहोत्सवाप्रीत्यर्थ संगीताचा काही भव्य कार्यक्रम करण्याची इच्छा व्यक्त केली. महाराजांनी त्याकरीता वरील आठ लोकांची समिती अब्बास तैय्यबजींच्या नेतृत्वाखाली नेमली आणि याची रंगीत तालीम दसऱ्याच्या दिवशी करण्याचे योजिले.

१८९५ ला फत्तेसिंहरावांचा तेरावा जन्मदिवस साजरा झाला. या उत्सवानिमित्त दरबारात गायन-वादन झाले. या समारंभात

अमीर खाँचे जलतरंग वादन झाले. ते राजकुमारांना खूप आवडले. त्यांनी मातु:श्रींना हे वादन शिकायची इच्छा असल्याचे सांगितले. त्यानुसार चिमणाबाईंनी अब्दुल करीम खाँनकडे राजकुमारांची जलतरंग शिकण्याची इच्छा बोलून दाखविली व त्यांच्या या शिक्षणास सुरुवात झाली.

या गायन आणि वादनाच्या तालमीने राजकुमार आणि अब्दुल करीम खाँ व अब्दुल हक्क या दोन्ही बंधूची इतकी सलगी झाली की, शिकार, घोड्यावर बसणे, खेळणे वगैरेही एकत्र होऊ लागले. इतर सरदारांची मुलेही त्यांच्या संगतीत आली. मुलांची संगीत शास्त्रातली प्रगती सरदार माने व खासेरावांनी महाराजांच्या कानावर घातली. त्यांना खूप समाधान वाटले. राजकुमार फत्तेसिंह जलतरंग वाजवण्यात तरबेज होत होते. राजकुमार जयसिंहराव व शिवाजीराव सतार वाजवायला शिकत होते. तर इंदिराराजे गायनामध्ये प्रगती करत होत्या.

## महाराजांचे गायन परिषदेतलं भाषण, १९२९

१० मार्च १९२९ रोजी बडोदे येथील राजवाड्याच्या विशाल दिवाणखान्यात गायनपरिषद भरली होती. महाराजांनी या परिषदेच्या उद्घाटन प्रसंगी केलेल्या भाषणात संगीताचे महत्व अधोरेखित केले आहे. संगीत म्हणजे जीवनाला माधुरी व रमणीयता देणारी वल्ली आहे. मनाला मेणाहून मऊ करण्याची किंवा कठीण करण्याची कला संगीताच्या अंगी असते. दयेचा पाझर फोडण्याचे, आनंदाचे किंवा दु:खाचे अश्रू झिरपायला

लावायचे व वीरश्रींचा संचार करण्याचे सामर्थ्य संगीताच्या ठायी असते. अशा उपयुक्त कलेला उत्तेजन द्यावे व प्रजेला संगीताची गोडी लावावी म्हणून त्यांनी राज्यात शाळा काढून त्यांच्याद्वारे त्या कलेचा प्रसार करण्याची व्यवस्था केली.

पुढे या भाषणात त्यांनी आपण संगीत कलेसाठी आजपर्यंत कोणते प्रयत्न केले याविषयी सांगितले. पण माझ्या प्रयत्नांना पाहिजे तसे यश आलेले नाही याला दोन कारणे आहेत असे ते म्हणाले. एक म्हणजे, आपल्या कडील संगीततज्ज्ञांना आपले स्वत:चे ज्ञान लपवून ठेवण्याची आणि आपल्या पट्टशिष्यांनाही ते न देण्याची असलेली सवय हे होय. दुसरे कारण असे की, इकडच्या लोकांची आपल्या आयुष्यात सात्त्विक आनंदाचा पूर्ण उपभोग घेण्याची प्रवृत्ती फार कमी आहे हे होय. याला आपल्या इकडचे दारिद्रय, औद्योगिक क्रांती वगैरे गोष्टी बऱ्याच अंशी कारणीभूत असल्या, तरी आपला नित्याचा उदयोग अधिक चांगल्या रीतीने करता येण्यास संगीताचा फार उपयोग होतो, या दृष्टीनेही त्या कलेचे ज्ञान संपादन करणे व त्याच्याबद्दल आपली अभिरुचि वाढविणे अवश्य आहे.

शेवटी महाराज म्हणाले, “कोणत्याही देशाच्या संस्कृतीची किंमत जर आपल्याला अजमावयाची असेल, तर त्या देशांतील ललितकलांकडे आपण लक्ष द्यावे. गायन, चित्रकला आणि शिल्पकला या तीन कला राष्ट्राच्या संस्कृतीचीं चिन्हें आहेत व त्यांच्यापासून राष्ट्राला प्रकाश व चैतन्य प्राप्त होतें असे माझें ठाम मत आहे.” याप्रमाणे आपल्या राज्यात कलांचा विकास व्हावा

या दूरदृष्टीने महाराजांनी केलेले प्रयत्न ते कलासक्त असण्याचे मोठे उदाहरण आहे.

## बडोदा संस्कार नगरी

महाराजांनी आपला भारतीय सांस्कृतिक कलावारसा न गमवता त्यात यथाशक्ती वाढच केली, हेच त्यांच्या खऱ्या स्वदेशी वृत्तीचे लक्षण होय. कलाकारांच्या कला सादरीकरणात सुधारणा घडवून आणण्याच्या दृष्टीने कला सादरीकरणासाठीचा टापटिपीचा आणि शिस्तीचा अभाव दूर करण्यावर सयाजीरावांचा विशेष कटाक्ष होता. तबला, तंबोरा इत्यादी वाद्यांचा सूर जुळेपर्यंत तसेच आपला सूर लागला असल्याचे समाधान गायकाला मिळेपर्यंत तासनतास निघून जात, त्यानंतर मूळ मैफीलीची सुरुवात होत असे. त्यांचा असाही आग्रह असायचा की, नाटकांचे खेळ भल्या पहाटेपर्यंत चालू नयेत. नाटक कटाक्षाने रात्री आठ वाजता सुरू होऊन मध्यरात्रीपूर्वी संपावे. महाराजांनी प्रजेला उत्तोमत्तम कला-संस्कार करण्याच्या हेतूने संगीतकलेस प्राधान्य देणे हे आपले कर्तव्य समजून बडोद्याला संस्कार नगरी करण्यासाठी अतोनात प्रयत्न केले. त्यासाठी महाराजांनी आपले आत्मबळ, धैर्य, सबूरी, अथक मेहनत व दुरदृष्टी पणाला लावलेली दिसते. यामुळेच महाराजा सयाजीराव यांच्या उदार आश्रयाखाली कला-कलोपासकांची सांस्कृतिक नगरी बडोद्यात उभी राहिली.

●●●

# संदर्भ

## मराठी ग्रंथ

१) आपटे नागेश दाजी, १९३६, श्री महाराजा सयाजीराव गायकवाड (तिसरे) यांचे चरित्र, खंड १ ते ३, प्रकाशक लेखक खुद, बडोदे

२) भांड, बाबा, २०१७, गौरवगाथा युगपुरुषाची, खंड १२, महाराजा सयाजीराव गायकवाड चरित्र साधने प्रकाशन समिती उच्चशिक्षण विभाग, महाराष्ट्र शासन, मुंबई.

३) भडकमकर अभिराम, २०११, असा बालगंधर्व, राजहंस प्रकाशन, पुणे.

४) देवधर बी. आर., १९७१, गायनाचार्य पं. विष्णू दिगंबर पलुसकर, अखिल भारतीय गंधर्व महाविद्यालय मंडळ, मुंबई.

५) शिल्पकार चरित्रकोश, खंड ७, भाग - १, चित्रपट आणि संगीत, हिंदुस्थान प्रकाशन संस्था, मुंबई.

६) ताटके अरविंद, २००३, बालगंधर्व, मीनल प्रकाशन, कोल्हापूर.

७) बडोदे सरकार, १९२५, कलावंत खात्याच्या आंतरव्यवस्थेसंबंधी नियम, बडोदे सरकारी छापखाना, बडोदा.

८)केळकर, नीलकंठ, १९६७, भास्करबुवा बखले, बा. ढवळे, कर्नाटक प्रकाशन संस्था, मुंबई.

९) कपिलेश्वरी. बाळकृष्णबुवा, १९७२, अब्दुल करीम खाँ, पॉप्युलर बुक डेपो, मुंबई.

१०) नाशिककर, चंद्रकांत, साहित्य संगीत कला विहीन, बडोदा.

१२) गायकवाड सयाजीराव, २०१७, भाषण संग्रह खंड १, भाग १-२, संपादक : रमेश वरखेडे, महाराजा सयाजीराव गायकवाड चरित्र साधने प्रकाशन समिती उच्चशिक्षण विभाग, महाराष्ट्र शासन, मुंबई.

१३) गायकवाड सयाजीराव, २०१७, पत्रसंग्रह खंड १ ते ३, भाग १-३. संपादक : अकनाथ पगार, महाराजा सयाजीराव गायकवाड चरित्र साधने प्रकाशन समिती उच्च शिक्षा विभाग, महाराष्ट्र शासन, मुंबई.

१४) सरदेसाई गो.स., १९५६, श्री सयाजीराव यांच्या आठवणी, एस. जगन्नाथ ॲण्ड कंपनी, पुणे.

१५) सरदेसाई गो.स., १९५६, माझी संसार यात्रा, केशव भिकाजी ढवळे, मुंबई.

१६) रातंजनकर डॉ. एस.एन., १८८९, विष्णू नारायण भातखंडे, नॅशनल बुक ट्रस्ट, इंडिया, दिल्ली.

१७) टेंभे गोविंदराव, सप्टेंबर १९४८, माझा जीवनविहार, दी भारत बुकस्टॉल, कोल्हापूर.

## इंग्रजी ग्रंथ

१८)**Bakhle Janavi, 2005, Two Men and Music, Oxford University Press.**

१९) **Gaekwad Fatehsinghrao, 1989, Sayajirao of baroda, A Prince and a Man, Popular Publication, Mumbai.**

## महाराजा सयाजीराव ज्ञानमाला नामसूची

१) शिवसृष्टीचे निर्माते - सागर मोहिते
२) कृतीशील सत्यशोधक - दिनेश पाटील
३) राजर्षी शाहू - दिनेश पाटील
४) एक 'क्रांतीपर्व' - आंबेडकर - दिनेश पाटील
५) दानशूर महाराजा सयाजीराव - डॉ. राजेंद्र मगर
६) दामोदर सावळाराम यंदे - राजश्री कदम
७) खासेराव जाधव - शिवानी घोंगडे
८) कृष्णराव अर्जुन केळूसकर - सुरक्षा घोंगडे
९) सावित्रीबाई फुले - शिवानी घोंगडे
१०) विठ्ठल रामजी शिंदे - पवन साठे
११) गंगारामभाऊ म्हस्के - दिनेश पाटील
१२) रियासतकार गो. स. सरदेसाई - दिनेश पाटील
१३) योगी अरविंद घोष - डॉ. राजेंद्र मगर
१४) महाराणी चिमणाबाई सयाजीराव गायकवाड - सुरक्षा घोंगडे
१५) कर्मवीर भाऊराव पाटील - शिवानी घोंगडे
१६) बडोद्यातील वेदोक्त - राजश्री कदम
१७) धर्म खाते - सुरक्षा घोंगडे
१८) हिंदू पुरोहित कायदा - देवदत्त कदम
१९) तुलनात्मक धर्मचिंतक - देवदत्त कदम
२०) जातविषयक चिंतन - सुरक्षा घोंगडे
२१) इंदिराराजेंचा क्रांतिकारक विवाह - देवदत्त कदम
२२) हिंदू कोड बिल - देवदत्त कदम
२३) दुसरी जागतिक सर्वधर्म परिषद - डॉ. राजेंद्र मगर
२४) सक्तीचा प्राथमिक शिक्षण कायदा - राजश्री कदम
२५) स्त्रीविषयक कार्य - शिवानी घोंगडे
२६) मराठी भाषा, साहित्य व संस्कृती - निलोफर मुजावर
२७) संस्कृत शिक्षण - निलोफर मुजावर
२८) धर्मानंद कोसंबी - निलोफर मुजावर
२९) बौद्ध धर्म - सौरभ गायकवाड
३०) मराठी पत्रकरीता - सौरभ गायकवाड
३१) नानासाहेब शिंदे - देवदत्त कदम
३२) महात्मा गांधी - दिनेश पाटील
३३) श्रीधर व्यंकटेश केतकर - सौरभ गायकवाड
३४) प्राच्यविद्या - सौरभ गायकवाड
३५) आरोग्य आणि व्यायामविषयक कार्य - शिवानी घोंगडे
३६) अखिल भारतीय मराठा शिक्षण परिषद - सत्यनारायण आरडे
३७) भारताचा स्वातंत्र्यलढा - राहुल वणवे
३८) महाराजा सयाजीराव आणि जगप्रवास - दिनेश पाटील
३९) निर्व्यसनी, चारित्र्यवान, सार्वभौम राजा - बाबा भांड
४०) ललितकला - धारा भांड मालुंजकर

४१) राजा रवी वर्मा - धारा भांड मालुंजकर
४२) बालगंधर्व - धारा भांड मालुंजकर
४३) दादासाहेब फाळके
- धारा भांड मालुंजकर
४४) बडोद्यातल्या वास्तू
- धारा भांड मालुंजकर
४५) संगीत शिक्षण - धारा भांड मालुंजकर
४६) बडोद्याचे कलाभवन
- सौरभ गायकवाड
४७) बँक ऑफ बडोदा - देवदत्त कदम
४८) दुष्काळ दौऱ्याच्या नोंदी
- दिनेश पाटील
४९) शेतीविकास - देवदत्त कदम
५०) उद्योग विकास - सौरभ गायकवाड
५१) सहकार विकास - राहुल वणवे
५२) जलनियोजन (जलसंवर्धन)
- डॉ. राजेंद्र मगर
५३) पूरनिवारण - डॉ. राजेंद्र मगर
५४) सत्यशोधक धामणस्कर
- सत्यनारायण आरडे
५५) बडोद्याचा लक्ष्मीविलास पॅलेस
- पवन साठे
५६) लोकपाळ राजा सयाजीराव : चरित्र
- बाबा भांड
५७) यशवंतराव चव्हाण - दिनेश पाटील
५८) धर्म विचार - बाबा भांड
५९) राजाराम शास्त्री भागवत - बाबा भांड
६०) छत्रपती शाहू - बाबा भांड
६१) महाराजा सयाजीराव 'प्रजासत्ताक' राजा - अनिल वकटे
६२) महात्मा फुले, मामा परमानंद आणि सायाजीरावांना पत्रे - मामा परमानंद
६३) बहुजनांच्या शिक्षणासाठी मदत
- बाबा भांड
६४) आरक्षण : सयाजीरावांचे आणि शाहुंचे - दिनेश पाटील
६५) दानशूर महाराजा सयाजीराव आणि जमशेटजी टाटा - डॉ. राजेंद्र मगर

आपणास वरील पैकी काही ई-बुक हवे असल्यास संपर्क करावा

बाबा भांड - ९८८१७४५६०४, दिनेश पाटील -९६२३८५८१०४,
डॉ. राजेंद्र मगर -९४२०३७८८५०, धारा भांड मालुंजकर - ९८८१७४५६०८
महेश मोधे - ८७८८२०८९९०

## महाराजा सयाजीराव प्रकाशित साहित्य :



**❐ महाराष्ट्र शासन : २५ खंडातील ६२ ग्रंथ = २६६४२ पृष्ठे**

**मराठी :**

- भाषण संग्रह : २ ग्रंथ
- गौरवगाथा : १ ग्रंथ
- सुप्रशासन : २ ग्रंथ
- शिक्षण सुधारणा : १ ग्रंथ
- सयाजीराव चरित्रे : ५ ग्रंथ
- पत्रसंग्रह : ३ ग्रंथ
- सयाजीराव लेखन : २ ग्रंथ
- जगप्रवास : ३ ग्रंथ
- आठवणी व लेख : ३ ग्रंथ
- सुधारणा : १० ग्रंथ = एकूण ३२ ग्रंथ

**English**

- Specchess & Adresses : 2 Books
- Writings of Sayajirao : 2 Books
- World Tour Reports : 3 Books
- Biographies : 5 Books
- Letters : 4 Books
- Administration : 1 Books
- Education Reforms : 3 Books
- Total English Books : 20

**हिन्दी :**

- सयाजीराव का लेखन : १
- सयाजीराव जीवनी : २
- पत्र संग्रह : ३
- स्वतंत्र्य युद्ध के समर्थक : १
- भाषण संग्रह : २
- गौरवगाथा : १ = १० ग्रंथ

**साहित्य संस्कृती मंडळ आणि अकादमी : ५ ग्रंथ**

- महाराजा सयाजीराव ट्रस्ट : ३० ग्रंथ
- साकेत प्रकाशन प्रा. लि. औरंगाबाद

कथा, कादंबरी, चरित्र्य, इतिहास, बोधकथा, किशोर कादंबरी, फुले, आंबेडकर, लिखित - संपादित १३ ग्रंथ

---

● महाराष्ट्र शासन प्रकाशित ग्रंथ शासकीय ग्रंथ गार आणि अधिकृत विक्रेते साकेत प्रकाशन यांचेकडे उपलब्ध.

● सयाजीराव ट्रस्ट, शासन व साकेत प्रकाशनाचे महाराजा सयाजीरावांचे वरील ग्रंथ उपलब्ध :

---

साकेत प्रकाशन प्रा. लि., ११५ महात्मा गांधीनगर, औरंगाबाद ४३१००५
मो. : ९८८१७४५६०५, ९८८१७४५६०४

●●●